## अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## घनकचरा व्यवस्थापन विभाग
## निविदा क्र.5

निविदा सन 2020-2021 दिनांक:- 09 /09/2020

अहमदनगर महानगरपालिका मा.आयुक्त यांच्या दिनाक 9/09/2019 रोजीच्या मंजुरी अन्वये अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये निर्माण होणा-या घनकच-यावर सावेडी स.नं.289 या ठिकाणी दैनंदीन 50 मे.टन क्षमतेचा कचरा खत प्रक्रिया ( Processing plant 50 TPD) मशिनरी उभारणे बाबत सोबत जोडलेल्या तपशीलानुसार मशिनरी खरेदी करणे ,Plant उभारणी करणे व कार्यान्वीत करणे कामी तसेच एक वर्षा करीता देखभाल व दुरुस्ती करणेकामी खाजगी एजन्सीची नियुक्ती करणेकामी पेटी पध्दतीची निविदा मागविण्यात येत आहे.

| Sr.No | Envelopes | Start Date & Time | Expiry Date & Time |
|---|---|---|---|
| 1 | निविदा विक्री | 10/09/2020 : 10:00 | 23/09/2020 : 12:00 |
| 2 | निविदा स्विकृती | 23/09/2020 : 12 :01 | 23/09/2020 : 17:00 |
| 3 | तांत्रिक लिफाफा उघडणे | 23/09/2020 : 17:01 | 24/09/2020 : 15:00 |
| 4 | व्यापारी लिफाफा उघडणे | 24/09/2020 : 15:01 | 25/09/2020 : 17:45 |

| कामाचा तपशिल | कामाची कालावधी, प्रकल्प उभारणी | निविदा फॉर्म रक्कम रु. | बयाणा रक्कम रु. |
|---|---|---|---|
| अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये निर्माण होणा-या घनकच-यावर सावेडी स.नं.289 या ठिकाणी दैनंदीन 50 मे.टन क्षमतेचा कचरा खत प्रक्रिया ( Processing plant 50 TPD at Burudgaon ) मशिनरी उभारणे बाबत सोबत जोडलेल्या तपशीलानुसार मशिनरी खरेदी करणे ,Plant उभारणी करणे व कार्यान्वीत करणे कामी तसेच एक वर्षा करीता देखभाल व दुरुस्ती करणेकामी खाजगी एजन्सीची नियुक्ती करणे. | प्रकल्प उभारणी तीन महिने व एक वर्ष देखभाल व दुरुस्ती | रु.10,000/- | रु.1,50,000/- |

1) सदर कामाबाबत निविदा अटी शर्ती इ बाबतचा सर्व तपशील निविदा संचामध्ये व जाहिर टेंडर नोटीसमध्ये नमुद केलेला असुन निविदा संच प्रकल्प/घनकचरा व्यवस्थापन विभागाकडेस पहावयास उपलब्ध आहे.
2) सदर कामाची निविदा संच खरेदी किंमत व बयाणा रक्कम प्रकल्प/घनकचरा व्यवस्थापन विभागाकडेस भरावी.
3) निविदा विक्री प्रकल्प/घनकचरा व्यवस्थापन विभागाकडेस वरील प्रमाणे दिलेल्या मुदतीत चालु राहील.
4)बयाणा रक्कम प्रकल्प/घनकचरा व्यवस्थापन विभागाकडे निविदा सादर करण्याच्या दोन दिवस अगोदर भरणे आवश्यक आहे.निविदा स्विकृतीच्या दिवशी बयाणा भरण्यास तांत्रिक अडचण निर्माण झाल्यास इच्छुक निविदाकार जबाबदार राहिल.
5)वरील निविदा सादरीकरण /स्विकृती पेटी पध्दतीने करण्यात येईल..
6) निविदा सादरीकरण हे दोन पाकीट पध्दतीने(Technical व Commercial bid) करणे आवश्यक आहे.
7) निविदा उघडण्याच्या अखेरच्या दिवशी कार्यालयीन सुट्टी असल्यास निविदा पुढील कार्यालयीन दिनांकास उघडण्यात येईल.
8)निधि उपलब्धतेनुसार देयक अदा करण्यात येईल.

9)कोणतीही निविदा स्वीकारणे,नाकारणे अथवा रद्द करणे याबाबतचे अंतिम अधिकार मा.आयुक्त,अहमदनगर महानगरपालिका यांना राहतील.

1)सिलबंद तांत्रिक लिफाफा क्र.1 पुढील कागदपत्रे असतील

1) संस्था नोंदणी प्रमाण पत्राची साक्षांकित प्रत.

2) कामगार भविष्य निर्वाह निधी प्रमाण पत्र.

3) जी.एस.टी क्रमांक

4) संस्थेची मागील वर्षाची किमान 50 लक्ष आर्थिक उलाढाल असणे आवश्यक आहे.

5) पॅनकार्ड.

6) निविदाधारकास महानगरपालिका अथवा अ वर्ग नगरपालिका मधील घनकचरा व्यवस्थापन विभागाकडेस 25 मे.टन क्षमतेचे खत प्रकल्प मशिनरी विक्री केल्याचे अनुभव असले बाबत कागदपत्रे आवश्यक आहे.

7) आयकर विवरण पत्र लगतचे दोन वर्षाचे.

8)कामगार अपघात विमा.

9)भविष्य निर्वाह निधी भरलेबाबत मागील चलन.

2)सिलबंद दराचा लिफाफा क्र 2

- आपले दर पत्रक मध्ये मनपाने ठेकेदारास अदा करण्यात येणारी रक्कम ही सोबत जोडलेल्या दर पत्रकात बिनचुक भारावी (खाडा खोड करू नये.)

1) अटीयुक्त निविदा विचारात घेतली जाणार नाही.तसेच निविदे प्रक्रिया मुदतीत दाखल दर बाबत पुन्हा पत्र वैगरे किंवा इतर मार्गाने कमी जास्त करता येणार नाही.मनपा छाणनी समोर निर्णय घेण्यात येईल.

2) यशस्वी ठेकेक़दारास योग्य किंमतीच्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करुन द्यावा लागेल.

3) यशस्वी ठेकेदारास कामापोटी नियमानुसार अनामत रक्कम भरावी लागेल .

5)निविदा विक्रीच्या शेवटच्या दिवशी संच प्राप्त न झाल्यास व स्विकृती च्या शेवटच्या दिवशी पेटी पध्दतीने सादरीकरण न झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी निविदा धारकाची राहील.

6)सर्व कागदपत्रे अनुक्रमांक टाकुन अपलोड करावीत.

7)निविदा उघडण्याच्या अखेरच्या दिवशी कार्यालयीन सुट्टी असल्यास निविदा पुढील कार्यालयीन दिनांकास उघडण्यात येईल.

8)कोणतीही निविदा स्वीकारणे,नाकारणे अथवा रद्द करणे याबाबतचे अंतिम अधिकार मा.आयुक्त,अहमदनगर महानगरपालिका यांना राहतील

9)तांत्रिक लिफाफा उघडते वेळी निविदाधारक किंवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी यांनी निविदे मध्ये स्कॅन करुन जोडलेल्या कागद पत्राचे मुळ प्रती सादर कराव्या .

10)निविदाकाराने निविदा दाखल केल्यानतंर जेव्हा मनपा आर्थिक दर लिफाफा उघडेल त्यानंतर दराबाबत कोणतेही फेर फार किंवा त्याबाबत पत्र सादर करता येणार नाही कदाचित एखाद्या निविदाकाराने ऑन लाईन निविदा मुदत नंतर असे दर सादर केल्यास त्याचा विचार केला जाणार नाही.

आयुक्त

अहमदनगर महानगरपालिका,अ.नगर

निविदा फॉर्म:

अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर घनकचरा व्यवस्थापन विभाग

## निविदे मधील तपशिलानुसार एकुण रक्कमेचे दर पत्रक

| कामाचा तपशील | कामाची कालावधी, प्रकल्प उभारणी | निविदाकाराने नमुद करावयाचे दर सर्व करासहीत रक्कम रुपये प्रति मे.टन | शेरा |
|---|---|---|---|
| अहम्दनगर महान्नगरपालिका हद्दीमध्ये निर्माण होणा-या घनकच-यावर सावेडी स.नं.289 या ठिकाणी दैनंदीन 50 मे.टन क्षमतेचा कचरा खत प्रक्रिया ( Processing plant 50 TPD मशिनरी उभारणे बाबत सोबत जोडलेल्या तपशीलानुसार मशिनरी खरेदी करणे ,Plant उभारणी करणे व कार्यान्वीत करणे कामी तसेच एक वर्षा करीता देखभाल व दुरुस्ती करणेकामी खाजगी एजन्सीची नियुक्ती करणे | प्रकल्प उभारणी तीन महिने | सोबत जोडलेल्या तपशीला नुसार अहमदनगर महानगरपालिकेस रक्कम रु. ........................... (अक्षरी- ......................................................) या दराने दैनंदीन 50 मे.टन क्षमतेचा कचरा खत प्रक्रिया मशिनरी ( Processing plant 50 TPD ) उभारणे करुन देवु त्याचे प्रत्येक्षक दाखवुन त्याची प्रशिक्षण सुध्दा देवु व एक वर्षाकरीता देखभाल दुरुस्ती प्रति वर्ष रक्कम रु......................................../- (अक्षरी........................................................ ...........................................या दराने काम करु. | |

निविदाच्या अटी व शर्ती मला मान्य असुन त्या प्रमाणे निविदा दर भरुन सादर करीत आहे.

निविदाधारकाची स्वाक्षरी व शिक्का

नावः-

पत्ताः-

आयुक्त

अहमदनगर महानगरपालिका,अ.नगर

# अटी व शर्ती

1)मिळकतीचे वर्णन : अहमदनगर महानगरपालिका यांचे मालकीची सावेडी स.नं. 289 यापैकी अविभक्त जागा आहे. त्या जागेवर खत प्रकल्प मशिनरी उपलब्ध करणे,उभारणे व चालु करुन देणे व प्रशिक्षण देणे बंधनकारक आहे.काही कारणास्तव जागा बदलणे आवश्यक असल्यास त्याप्रमाणे पुरवठादास कळविण्यात येईल.

2)"घनकच-यावर शास्त्रोक्त प्रक्रिया करुन खत निर्मिती करण्यासाठी आवश्यक ती यंत्रणा उभारणी करणे आणि इतर अनुषंगिक कामे" यासाठी सदरची जागा, वापरण्याची अनुमती दिली आहे. तरी ठरवुन दिलेल्या यंत्रणेत महानगरपालिकेच्या परवानगी शिवाय बदल करणार नाही.

3)अहमदनगर महानगरपालिकेचे समाधान होईल अशा पध्दतीने व अनुसुचीप्रमाणे करारानुसार काम पुर्ण करण्याची जबाबदारी यशस्वी ठेकेदारावर राहील.

4)सदरचा प्रकल्प कार्यारंभ आदेशानंतर त्वरीत सुरु करण्याची जबाबदारी ठेकेदाराची यांच्यावर राहील. त्वरीत प्रकल्प पुर्ण होणेस अडचण असल्यास मुदतवाढी बाबत/दंडाबाबत सदर कामी म.न.पा. कडुन निर्णय घेण्यात येईल.

5)प्रकल्प उभारणी बाबत रोजगार किंवा कामगारांचे बाबतीत केंद्र शासन, राज्य शासन आणि स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या कायद्याचे / नियमांचे / आदेशाचे पालन करणेची सर्वस्वी जबाबदारी यशस्वी ठेकेदार यांची राहील. किमान वेतन कामगार कायद्याचे पालन करणेची जबाबदारी ठेकेदाराची राहिल.

6)प्रकल्पांतर्गत निविदेतील तपशीलानुसार सर्व मशिनवरी पुर्ण क्षमतेने उभारणे बंधनकारक राहील.आवश्यक उपकरणे योग्य त्या मानांकनाची पुरवठादाराकडुन उपलब्ध करणेची आहे.

7)यशस्वी ठेकेदारा सोबत झालेल्या करारनाम्यातील सर्व अटी व शर्ती अहमदनगर महानगरपालिका व यशस्वी ठेकेदार यांचेवर बंधनकारक राहील.

8)प्रस्तुत करारातील प्रकल्पा संदर्भात कोणताही वाद निर्माण झाल्यास त्यास संबंधीचे दावे / फिर्यादी या अहमदनगर न्यायालयातच दाखल करता येईल.

9)राज्य / केंद्र शासनाचे विविध दर / कर हे अदा करावयाची व त्याबाबत आवश्यक प्रमाणपत्र द्यावयाची जबाबदारी यशस्वी पुरवठादार यांचेवर राहील. याबाबत काही वाद उपस्थित झाल्यास यशस्वी ठेकेदार यांनी स्वतः त्यांचे निराकरण करावयाचे आहे.

10)सदर प्रकल्प उभारणा-या संबंधीत यशस्वी ठेकेदार यांना महानगरपालिकेतर्फे Municipal Solid Waste Management and Handling Rules 2016 अंतर्गत म्हणुन Operator of Facility संबोधण्यात येईल.

अ.Maharashtra Municipal Corporations Act 1949 व त्या खालील असलेले सर्व नियम व त्यात वेळोवेळी होणा-या सुधारणा (ज्यांचा यापुढे सदरहु नियम म्हणुन उल्लेख केलेला आहे.)

ब. नागरी घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम 2016 व त्यात वेळोवेळी होणा-या सुधारणा (Amendment) (ज्याचा यापुढे सदरहु नियम म्हणुन उल्लेख केलेला आहे) यानुसारच प्रकल्प पुर्ण करावा लागेल.

क)मंजुर डिपीआर नुसार मशिनरी पुरवठा करावा लागेल.

11)सदर प्रकल्प उभारणी करीता आवश्यक यंत्रसामुग्री तसेच अत्यावश्यक बांधकामे यशस्वी ठेकेदार स्वखर्चातुन उभारणी करावयाची आहे.

12)सदर मशिनरी Plant हा करारनामा निष्पादीत (Execute) झाल्याचे तारखेपासुन दोन महिन्याच्या आत उभा करणे यशस्वी ठेकेदार यांना बंधनकारक राहील.

13)सदर प्रकल्पासाठी उल्लेखीत केलेल्या अटी व शर्तीमध्ये त्रुटी राहिल्यास भारत सरकार वन व पर्यावरण मंत्रालय, नागरी घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम 2016 व मंजुर डिपीआर नुसार तसेच त्यात वेळोवेळी होणा-या सुधारणा यांच अंतर्गत नमुद केलेल्या नियमानुसार कारवाई करणे यशस्वी ठेकेदार यांना बंधनकारक राहील.

14)सदर प्रकल्पाबाबत करारानाम्यामध्ये असलेल्या अटी व शर्तीमध्ये फेरबदल करण्याचा अधिकार मा.महापालिका आयुक्त यांना राहील. या व्यतिरिक्त मा.आयुक्त यांनी वेळोवेळी निनिर्दीष्ट करतील अशा अटी व शर्ती लागु राहतील.

15)सदर प्रकल्पांतर्गत यशस्वी ठेकेदार यांचे द्वारा कोणत्याही पक्षाशी निष्पादात केल्या गेलेल्या कोणताही करार महानगरपालिकेवर बंधनकारक राहणार नाही.

16)हा करार अस्तित्वात असतांना किंवा कराराचा भंग केल्यावर किंवा कराराचे निर्धारण झाल्यानंतर लिहुन घेणार व लिहुन देणार यांच्यात किंवा त्यांचे उत्तरधिकारी, वारसदार, प्रशासक, अधिहस्तांकिती या करारनाम्याशी संलग्न किंवा निगडीत असलेले सर्व विषय व प्रकरणातुन उद्भवणारे सर्व प्रकारचे विविद व मतभेत (ज्याच्यात करारनाम्याशी संबंधीत किंवा करारनाम्याचे निर्वचन, अर्थ लावणे, प्रभाव किंवा या करारनाम्यातील लिहुन घेणार व लिहुन देणार यांचे मध्ये किंवा त्यांचे उत्तरधिकारी, वारसदार, प्रशासक, अधिहस्तांकिती यांचे अधिकार हक्क, कर्तव्य किंवा दायित्व यांचा समावेश आहे). लवाद व समेट अधिनियम 1996 च्या अंतर्गत किंवा त्या अधिनियमाच्या सांविधानिक बदलाच्या अंतर्गत लवाद मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांना सोपविले जाईल. नेमलेल्या लावादाने इन्कार केल्यास किंवा असमर्थता दर्शविल्यास किंवा अक्षम झाल्यास लिहुन घेणार व लिहुन देणार यांना एक संमतीने नवीन लवाद नेमता येईल. लवादाचे नेमणे हे अंतिम असुन सर्व पक्षावर बंधनकारक राहील. लवाद यांना या करारनाम्याशी संलग्न अथवा निगडीत असलेले सर्व विषय व प्रकरणातुन उद्भवणारे सर्व प्रकारचे विविद व मतभेद बद्दल (Award) निवाडा देता येईल.

17)सदरहु घनकच-याचा प्रकल्प कार्यान्वित करण्याचे संदर्भात मागविण्यात असलेल्या निविदेतील अटी व शर्ती सरदहु करारनाम्याचा भाग राहतील.

18)करारनाम्यातील कलमांमध्ये काही त्रुटी राहिल्यास त्या करारनाम्याच्या वैध्यतेवर परिणामकारक राहणार नाही.

आयुक्त
अहमदनगर महानगरपालिका,अ.नगर